दि: ३१/०५/२०१८ (17)

तातडीचे :-

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/उद्योजकता व कौशल्य विकास/७९/२०१८

मुंबई, दि. .०५.२०१८

**विषय -: एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास योजना राबविण्याबाबत.**

* * * * * *

महाराष्ट्र पोलीस दलातील अनेक अधिकारी / कर्मचारी यांची मुले महाराष्ट्र पोलीसात तसेच इतर शासकीय सेवेमध्ये / खाजगी सेवेमध्ये नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतात. तथापि नोकरीच्या अपु-या संधी, नोकरीसाठी पात्रतेचा अभाव, तीव्र स्पर्धा इत्यादी अडचणीमुळे प्रत्येकास नोकरी मिळेल असे नाही. परिणामी नोकरी न मिळाल्यास उद्योगधंदा सुरु करण्यासाठी आर्थिक स्तरावर पाठिंबा न मिळाल्यामुळे भांडवल उभे करणे कठीण जाते. त्यामुळे अशी मुले नोकरी व व्यवसाय यांच्या अभावामुळे त्यांच्या आयुष्यात हतोत्साहित होण्याचा मोठा दुष्परिणाम संभावतो. यामुळे अशा मुलांकरीता तसेच पोलीस कर्मचा-यांच्या पती / पत्नी यांना नवीन उद्योगधंदा सुरु करण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने व पोलीस कर्मचारी यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी **एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास** ही योजना सुरु करण्यात येत आहे.

- **योजनेचे नांव :-** या योजनेस एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास असे संबोधण्यात येईल.

- **योजनेचे उद्दीष्ट व लाभार्थी :-** महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे १८ वर्षवरील पाल्यांना, पोलीस कर्मचा-यांच्या पती / पत्नींना नवीन लघुउद्योग सुरु करण्यासाठी अग्रीम तत्वावर परत फेडीच्या अटीवर आर्थिक भांडवल पुरविणे.

- **योजनेचे स्वरुप :-**

१. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या १८ वर्षावरील पाल्यांना, तसेच पोलीस कर्मचा-यांच्या पती / पत्नींना नवीन लघुउद्योग सुरु करण्याकरीता परिशिष्ठ - अ प्रमाणे विहीत नमुन्यात घटकप्रमुख यांचेकडे अर्ज सादर करावा.

२. घटकाचे पोलीस निरीक्षक पोलीस कल्याण यांनी अर्जाची पडताळणी करावी, ज्या जागेवर उद्योग सुरु करावयाचा आहे त्या जागेस भेट द्यावी. उद्योगाचे स्वरुप, जागेची परिस्थिती व उद्योग सुरु करणा-याची योग्यता याच्या अनुषंगाने लघुउद्योगाची व्यवहार्यता तपासावी. पोलीस आयुक्त / अधीक्षक / घटकप्रमुख यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण यांच्या अहवालाच्या अनुषंगाने अर्जदाराच्या पाल्यास, पती / पत्नींस अर्जदारासह मुलाखतीस बोलवावे व मुलाखतीनंतर प्रकरण निहाय मंजुरीचा निर्णय घ्यावा.

३. पात्र पाल्यांना, तसेच पोलीस कर्मचा-यांच्या पती / पत्नींस अग्रीम दिल्यांनतर ६ महिने नंतर १८ मासिक हप्त्यात अग्रीमाची वसुली करण्यात यावी.

४. भाजी विक्रीचे दुकान, शिलाई व्यवसायाचे दुकान, किरकोळ वस्तु विक्रीचा व्यवसाय, पेपर विक्री, पर्यटन अभिकर्ता, झेरॉक्स व्यवसाय या व यासारख्या इतर व्यवसायाकरीता कमाल बिनव्याजी रु.१,००,०००/- पर्यत अग्रीम भांडवल मंजुर करण्यात येईल

- **लाभार्थीची प्रात्रता :-**

१. लाभार्थी हा पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचा पाल्य अथवा पत्नी / पती असावा .

- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. विहीत नमुन्यातील अर्ज **( परिशिष्ठ - अ प्रमाणे )**

२. अर्जदार पोलीस कर्मचा-याच्या वेतनातून दरमहा हप्ता वजाती करण्यांचे संमतीपत्र. **( परिशिष्ठ - ड प्रमाणे )**

३. अर्जदार ज्या जागेत उद्योग सुरु करणार, त्या जागेचे भाडेकरारनामा अथवा गुमास्ता लायसेन्स वा इतर अनुषंगिक कागदपत्र.

Welfare Clerk

277
02/6/2018



Scanned by CamScanner

४. अर्जदार या योजनेतुन मिळणा-या भांडवला व्यतिरिक्त उद्योगास आवश्यक ते अधिक भांडवल कसे उभारणार त्याबाबतची माहिती.

५. ज्याच्यासाठी कर्ज घेणार आहे, त्या लाभार्थी पाल्य / पती / पत्नीचे आधारकार्ड झेरॉक्स.

**● अटी व शर्ती :-**

१. या योजनेखाली कोणताही उद्योग हा पोलीस विभागाच्या जागेवर करता येणार नाही.

२. सदर योजनेचा लाभ घेऊनही ३ महिन्याच्या आत लघुउद्योग सुरु न केल्यास अथवा योजनेचा गैरवापर केल्याचे दिसुन आल्यास संबंधित पोलीस कर्मचा-यांकडुन वार्षिक १२% व्याजदराने सर्व रक्कम ४ मासिक हप्त्यात वसुल केली जाईल.

**● लेखा ठेवणे :-**

१. प्रत्येक घटकप्रमुखांनी या योजनेसाठी **परिशिष्ठ - ब** प्रमाणे स्वतंत्र नोंदवही ठेवावी.

२. या योजनेसाठी वितरीत करावयाचा निधी घटक पोलीस कल्याण निधीमधुन वितरीत केला जाईल व त्याची प्रतिपूर्ती घटकप्रमुखांनी पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई कार्यालयास अहवाल पाठवल्यानंतर मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधून घटक कल्याण निधी मध्ये केली जाईल.

३. अग्रीम वितरीत करण्याच्या दिनांकापासुन परतफेड, ७ व्या महिन्यापासून १८ मासिक हप्त्यात बिनव्याजी, वेतनातुन वसुल केले जाईल.

**● घटकप्रमुखांचे पर्यवेक्षण :-**

१. घटकप्रमुखांनी या योजनेची जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी.

२. आपल्या घटकातील जास्तीत जास्त गरजूंना या योजनेचा लाभ देऊन पोलीसांवर अवलंबून असलेल्या त्यांच्या पाल्यांना, पती / पत्नींस स्वावलंबी होण्यास प्रोत्साहित करावे.

३. या योजनेअंतर्गत सुरु झालेल्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट देण्यासाठी पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) / पोलीस निरीक्षक (वेल्फेअर) यांना निर्देशित करुन या योजनेसंदर्भात गैरव्यवहार होणार नाही ही दक्षता घ्यावी. अशा भेटींची एक नोंदवही घटक मुख्यालयोमध्ये ठेवावी.

४. अग्रीमांसाठी आलेल्या अर्जाची योग्य ती पडताळणी करुन तसेच घटकनिधीची शिल्लक रक्कम व अर्ज याचा मेळ घालुन, दर वर्षास पोलीस आयुक्त यांना कमाल १५ अर्ज तर इतर घटक पोलीस प्रमुख यांना कमाल १० अर्ज मंजुर करता येतील.

५. तसेच एखादया अर्जदारास उद्योग सुरु करण्यासंदर्भात कागदपत्रे व नियम पूर्तता यासंबंधी अडचण येत असल्यास, **" स्कील सिखो ( https://skillsikho.com )", दे आसरा ( https://www.deasra.in )** " यासारख्या Online Tools ची मदत घेण्यासाठी कळवावे.

६. घटकप्रमुखांनी आपल्या जिल्ह्यातील भेटीदरम्यान या योजनेखाली अग्रीम दिलेल्या लघुउद्योगांच्या ठिकाणी भेटी द्याव्या.

सदरची योजना सन २०१८ - २०१९ या वर्षापासून लागू असेल व तिच्या अंमलबजावणीची माहिती पोलीस घटक प्रमुख प्रत्येक महिन्यास परिशिष्ट अ, ब, क आणि ड प्रमाणे या कार्यालयास सादर करतील.

( सतीश माथुर )
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned by CamScanner

## परिशिष्ठ - " अ "

**परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/उद्योजकता व कौशल्स विकास/७९/२०१८**

**-: एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास अंतर्गत अग्रीम मिळण्याबाबतचा विहीत नमुना :-**

* * * * * * *

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचा-यांचे नाव. | |
| २. | मोबाईल नंबर. | |
| ३. | सेवार्थ नंबर | |
| ४. | कार्यालयाचे / पोलीस स्टेशनचे नाव व पत्ता. | |
| ५. | ज्या नातेवाईकांसाठी कर्ज घ्यावयाचे आहे, त्यांचे नाव व नाते. | |
| ६. | लाभार्थ्यांचा आधारक्रमांक. | |
| ७. | कोणता व्यवसाय सुरु करावयाचा आहे. | |
| ८. | ज्या ठिकाणी व्यवसाय सुरु करणार आहे त्या ठिकाणाचा पत्ता | |
| ९. | व्यवसायाची जागा पोलीस विभागाची आहे का ? | |
| १०. | व्यवसायासाठी लागणारी एकुण रक्कम. | |
| ११. | अग्रीमासाठी मागणी केलेली रक्कम. | |
| १२. | अग्रीमाव्यतिरिक्त भांडवल उभारणीचे इतर स्त्रोत. | |
| १३. | वेतनातून अग्रीम वजाती भरण्याबाबत हमीपत्र जोडले आहे का ? | |

- पोलीस निरीक्षक / कार्यालयप्रमुख यांचे अभिप्राय :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

Scanned by CamScanner

## परिशिष्ठ - "ड"

### -: हमीपत्र :-

* * * * *

मी ------------------------------------असे जाहीर करतो की, माझा पाल्य / पती / पत्नी यास / हीस एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास अंतर्गत ----------------- हा व्यवसाय करण्याकरीता मिळालेले रु.---------/- चे अग्रीम फक्त ------------- हा व्यवसाय करण्याकरीताच वापरेन. तसेच मी असेही जाहीर करतो की, माझा पाल्य / पती / पत्नी सदरचा व्यवसाय पोलीस विभागाच्या परिसरात करणार नाही. तसेच अग्रीम वितरीत करण्याच्या दिनांकापासुन परतफेड, ६ महिन्यानंतर १८ मासिक हप्त्यात बिनव्याजी, वेतनातून वसुल करण्याची मी संमती देत आहे. सदर व्यवसाय माझा पाल्य / पती / पत्नी यांनी ३ महिन्यात सुरु केला नाही, तर अग्रीमाची सर्व रक्कम वार्षिक १२% व्याजदराने वसुल करण्यास मी संमती देत आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

१. साक्षीदारांचे नाव व सही :-

२. साक्षीदारांचे नाव व सही :-

Scanned by CamScanner